# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे-३७

जा.क्र. : प्रशा/व्य.मं./२०१६/ २२/११/२०१६

**कार्यवृत्तांत**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची सभा शुक्रवार दि. १८ नोव्हेंबर २०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता विद्यापीठ भवन, गुलटेकडी, पुणे-३७ येथे आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी खालील सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. दीपक ज. टिळक, कुलगुरु (अध्यक्ष)
२. डॉ. गीताली हृषिकेश मोने-टिळक, अधिष्ठाता, आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये अभ्यासमंडळ
३. डॉ. बा.शि.दामले, अधिष्ठाता, आरोग्यशास्त्र मंडळ
४. डॉ. मा. चिं. दीक्षित, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
५. डॉ. हेमंत अभ्यंकर, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
६. डॉ. श्री. ग. बापट, मा. कुलपती नामनिर्देशित शैक्षणिक तज्ज्ञ
७. डॉ. श्रीपाद भट, प्राध्यापक प्रतिनिधी
८. डॉ. माधवी रेणावीकर, सहयोगी प्राध्यापक प्रतिनिधी
९. सौ. प्रणति टिळक, विश्वस्त मंडळ प्रतिनिधी.
१०. डॉ. अभिजीत जोशी, प्रभारी कुलसचिव, (सचिव)

श्रीमती सरीता साठे सभेस उपस्थित राहू शकल्या नाहीत.

१) व्यवस्थापन मंडळाची मागील सभा दि. ०६ ऑक्टोबर २०१६ रोजी झाली. त्या सभेचा कार्यवृत्तांत संमत करणे व केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१८९**

कार्यवृत्तांत संमत करण्यात येत असून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतली.

२) वित्त समितीने मान्य केलेला विद्यापीठाचा सन २०१५-१६ चा ताळेबंद आणि अहवालास मान्यता देणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९०**

विद्यापीठाचा सन २०१६-१७ चा ताळेबंद आणि अहवालास मान्यता देण्यात आली. सदर ताळेबंद व अहवाल पुढील कार्यवाहीसाठी नियामक मंडळास सादर करण्यात यावा.

३) यु.जी.सी. चे. दि. २७ सप्टेंबर २०१६ चे पत्र क्र. D.No.F.1-2/2009(EC/PS)(vol.II) नुसार एम.फिल. / पी.एच.डी या अभ्यासक्रम व पदवी प्रदान संदर्भात यु.जी.सी. २०१६ ची नवीन नियमावली अंगीकरण्यासंदर्भात.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९१**

यु.जी.सी.च्या वरील पत्रानुसार एम.फिल. / पी.एच.डी या अभ्यासक्रम व पदवी प्रदान संदर्भात यु.जी.सी. २०१६ ची नवीन नियमावली जशीच्या तशी अंगीकारण्यास मान्यता देण्यात आली.

४) D. Lit/ D.Sc. (शैक्षणिक) मानद पदवी प्रदान करणेसंदर्भात मागील सभेत पी.एच.डी विभागाने तयार केलेली नियमावली सादर करण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र अधिनियम कायदा ची नियमावली विद्यापीठास प्राप्त झाली असून, सदर नियमावलीच्या नियम नं १६/२०१५ नुसार केलेल्या शिफारसी आपल्या विद्यापीठात जशाच्या तश्या अंगीकारण्याबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९२**

D. Lit/ D.Sc. (शैक्षणिक) मानद पदवी प्रदान करणेसंदर्भात महाराष्ट्र अधिनियम कायदा ची जी नियमावली विद्यापीठास प्राप्त झाली आहे, ती जशीच्या तशी अंगीकारण्यास मान्यता देण्यात आली.

५) पी.एच.डी विभागाकडून खालीलप्रमाणे काही प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, त्याबाबत विचार करणे व निर्णय घेणेबाबत -

अ) पी.एच.डी अभ्यासक्रमामधे मुदतवाढ (५ ते ७ वर्षे) व सदर मुदतवाढीसाठी अतिरिक्त शुल्क आकारणी.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९३**

याबाबत पी.एच.डी. समितीने निर्णय घ्यावा व प्रस्ताव तयार करून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी पाठवावा. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे अंतिम अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

ब) एम.फिल. अभ्यासक्रमास ३ वर्षानंतर मुदतवाढ द्यावी किंवा कसे? दिल्यास किती अतिरिक्त शुल्क आकारावे? त्यांच्या मार्गदर्शकांची नियुक्ती कशी करावी? एम. फिल. कोट्यातून पी.एच.डी. करिता किती जागा राखीव ठेवाव्यात?

**ठराव : व्य.मं.२०१६-१९४**

याबाबत पी.एच.डी. समितीने निर्णय घ्यावा व प्रस्ताव तयार करून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी पाठवावा. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे अंतिम अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

क) पी.एच.डी. मानधन :

- बाहेरगावाहून येणाऱ्या मार्गदर्शकांचे मानधन ठरविणे.
- RCC व Pre Viva साठी येणारे मार्गदर्शकांचे मानधन ठरविणे.
- २०१६-१७ पासून अंतर्गत मार्गदर्शकांसाठी मानधन ठरविणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९५**

याबाबत पी.एच.डी. समितीने निर्णय घ्यावा व प्रस्ताव तयार करून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी पाठवावा. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे अंतिम अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

ड) बाहेरगावाहून येणारे मार्गदर्शक व तज्ञांना वाहन भत्ता द्यावा काय व किती?

**ठराव : व्य.मं.२०१६-१९६**

याबाबत पी.एच.डी. समितीने निर्णय घ्यावा व प्रस्ताव तयार करून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी पाठवावा. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे अंतिम अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

इ) विभागप्रमुखांना प्रत्येक Ph.D. Viva साठी Sitting Allowance देण्यास मान्यता मिळणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९७**

याबाबत पी.एच.डी. समितीने निर्णय घ्यावा व प्रस्ताव तयार करून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेसाठी पाठवावा. सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे अंतिम अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.

ई) आत्तापर्यंत पी.एच.डी. विभाग परीक्षा विभागांतर्गत काम करीत होता. परंतु आता हा विभाग स्वतंत्ररित्या कार्यरत आहे. त्यामुळे या विभागाकरिता स्वतंत्र बजेटसाठी मान्यता मिळणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९८**

पी.एच.डी. विभागासाठी स्वतंत्र बजेटसाठी मान्यता देण्यात आली. विभागाने येत्या बजेट मिटींग मधे त्यांचा प्रस्ताव सादर करावा.

६) प्लॅगेरिझम शुल्कात वाढ करण्यास मान्यतेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-१९९**

पी.एच.डी. विभागाने सादर केलेल्या प्लॅगेरिझम शुल्कात वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

७) संशोधन कक्ष तयार करणे व त्यासाठी मिळणाऱ्या निधीसंदर्भात आयकर विभागाकडून मिळणारे फायदे व परिणामांसंदर्भात अहवाल तयार करणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२००**

संशोधन कक्ष तयार करण्यास मान्यता देण्यात आली. वरीष्ठ तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार सदर कक्ष स्थापन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

८) श्री. प्रकाश यादव यांना दोन महिने अध्ययन रजा देणेसंदर्भात त्यांनी केलेल्या विनंती अर्जाचा विचार करणे व निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०१**

श्री. प्रकाश यादव यांना दोन महिने अध्ययन रजा देणे शक्य होणार नाही. परंतु त्यांना त्यांच्या रोजच्या कामकाजासाठी निर्धारीत केलेल्या वेळातून दोन तास सूट देण्यास मान्यता देण्यात आली. त्यांना कोणते दोन तास सूट हवी आहे याबाबत त्यांनी प्रशासनास लेखी कळवावे.

९) एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रमाच्या २०११-१२ व २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाततील विद्यार्थांना सुधारित गुणपत्रिका देण्यासंदर्भात विभागप्रमुखांकडून आलेल्या विनंती अर्जावर निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०२**

एम.एस.डब्ल्यू अभ्यासक्रमाच्या २०११-१२ व २०१२-१३ या शैक्षणिक वर्षाततील विद्यार्थांना सुधारित गुणपत्रिका देण्यासंदर्भात विभागप्रमुखांकडून आलेल्या विनंती अर्जास मान्यता देण्यात आली.

१०) एम.फिल.- ग्रंथालयशास्त्र (वार्षिक पद्धती) अभ्यासक्रमाच्या एका विद्यार्थाची एका विषयाची बॅकलॉग परिक्षा डिसेंबर २०१६ मध्ये घेणेबाबत विचार करणे व निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०३**

एम.फिल.- ग्रंथालयशास्त्र (वार्षिक पद्धती) अभ्यासक्रमाच्या एका विद्यार्थाची एका विषयाची बॅकलॉग परिक्षा डिसेंबर २०१६ मध्ये घेण्यास मान्यता देण्यात आली.

११) डॉ. धनिष्ठा खंदारे, श्री. योगेश लांडगे, श्री. राजेश हिले व श्री. रविंद्र भोसले यांनी त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीस बाबत केलेल्या खुलाश्याची माहिती सदस्यांना देणे व त्यावर निर्णय घेणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०४**

याबाबत मा. कुलपती यांच्याशी चर्चा करून चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करावी. वरील नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून त्याबाबात अहवाल सादर करावा.

**मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्या वेळेचे विषय.**

१२) विद्यापीठाने माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २००७ मधे शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी प्रत्येकी रू.१ लाख रकमेची जीवन आनंद पॉलिसी काढली असून त्याचा वार्षिक हप्ता विद्यापीठ भरते. सदर पॉलिसी ची मुदत संपल्यानंतर ती रक्कम त्या-त्या कर्मचाऱ्याला प्राप्त होईल. परंतु यु.जी.सी. लेखापरिक्षणात या बाबीवर आक्षेप घेतला आहे. याबाबत काय करावे? १ लाख रूपयांची मर्यादा ठरविलेली असून सुद्धा सहा कर्मचाऱ्यांसाठी सदर पॉलिसी रू.२ लाख करण्यास विद्यापीठ प्रशासनाने मंजूरी दिली. डॉ. उमेश केसकर यांच्या नावे रू.१० लाख रूपयांची पॉलिसी घेण्यात आली असून त्या पॉलिसीचा हप्ता रू.९९४०६/- प्रतिवर्षी प्रमाणे ९ वर्षे असे एकूण रू.८,९४,६५४/- (रू. आठ लाख चौऱ्याण्णव हजार सहाशे चोपन्न) विद्यापीठाने भरले. यु.जी.सी. लेखापरिक्षण समितीच्या मते श्री. उमेश केसकर यांच्या नावे एवढी रक्कम जमा झालेली असूनही त्यांच्या आयकर विवरणात या रकमेचा उल्लेख नाही. हा कायद्यानुसार गुन्हा आहे.

वास्तविक विद्यापीठास यामुळे कोणताही फायदा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत काय निर्णय घ्यावा?

**ठराव : व्य.मं.२०१६-२०५**

सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्याने श्री. उमेश केसकर यांच्याविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार निलंबनाची कारवाई करण्यात यावी आणि विभागीय चौकशी करण्यात यावी.

१३) शासनमान्य वरिष्ठ लिपिक या पदासाठी दि. १६.११.२०१६ रोजी झालेल्या मुलाखतींतून निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवाराबद्दल माहिती देणे व निर्णय घेणेबाबत.
(विद्यापीठात रिक्त असलेले शासनमान्य वरिष्ठ लिपिक (खुला संवर्ग) या पदासाठी सेवाजेष्ठतेप्रमाणे डॉ. सुरेश गोपाळराव पाटील यांना मान्यता देण्याबाबत विचार करणे. सौ. स्वाती बेल्हे यांचा क्रम प्रथम होता. परंतु त्यांच्यावर विविध आरोप असल्याने त्यांना सेवेतून १४.०६.२०१६ रोजी निलंबित करण्यात आले असून त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू आहे. त्यामुळे सदर रिक्त पदावर क्र. दोन चे उमेदवार डॉ. सुरेश गोपाळराव पाटील यांचा विचार करण्याबाबत)

**ठराव : व्य.मं.२०१६-२०६**

डॉ. सुरेश गोपाळराव पाटील यांना वरिष्ठ लिपिक म्हणून मान्यता देण्यात आली. शासनमान्यतेनंतर त्यांना सदर पदोन्नती देण्यात येईल.

१४) श्री. उमेश केसकर व श्रीमती निलिमा मेहेता यांचेकडे पी.एच.डी. चे विद्यार्थी वर्ग करण्यात आले आहेत. परंतु श्री. उमेश केसकर निलंबित असल्याने व श्रीमती. निलिमा मेहेता निवृत्त झाल्याने व त्यांचेवर त्यांच्याच पी.एच.डी. संदर्भात चौकशी सुरू असल्याने त्यांचेकडील विद्यार्थी दुसरीकडे वर्ग करण्यात यावे की कसे? या बाबत विचार करणे व निर्णय घेणे.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०७**

श्री. उमेश केसकर व श्रीमती निलिमा मेहेता यांचेकडील विद्यार्थी दुसरीकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी नियमाप्रमाने घेण्यात येणारे ना हरकत प्रमाणपत्र श्री. उमेश केसकर व श्रीमती निलिमा मेहेता यांचेकडून घेण्याची गरज नाही.

१५) जानेवारी २०१७ पासून यु.जी.सी. नियमांनुसार नव्याने व्यवस्थापन मंडळाचे गठन होत आहे. तसेच या वर्षी विद्यापीठामधे वाढलेली विद्यार्थीसंख्या लक्षात घेता परिक्षा नियंत्रक, ॲकॅडेमिक डायरेक्टर व प्रो व्हाईस चॅन्सेलर ही पदे नव्याने निर्माण करावीत का कसे याबद्दल विचार करणेबाबत.

**ठराव : व्य.मं.२०१६-२०८**

नवीन व्यवस्थापन मंडळाचे गठन व वर नमूद केलेली पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

सही/- डॉ. अभिजीत जोशी
प्रभारी कुलसचिव

सही/- डॉ. दीपक ज. टिळक
अध्यक्ष